# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



संजय साबळे 8208137064 / 9921661173
विकी साबळे 8208068315
प्रिती नर्सरी अँन्ड लॉन सप्लायर्स
आमच्याकडे सर्व प्रकारचे शोभीवंत इनडोअर आऊटडोअर प्लॅन्टस तसेच लॉन मिळेल
पुणे - सोलापुर रोड, काळभोर लॉन्सच्यापाठीमागे, कवडीगाव रोड, ता. हवेली, जि. पुणे.



लातूर वर्ष ५ वे अंक ४६ बुधवार दि.२० ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## लातूर जिल्हा रुग्णालय निर्मितीला वेग, महिन्याभरात होणार भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली मंजूरी

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची हमी लातूर जिल्हा रुग्णालय निर्मितीला वेग, महिन्याभरात होणार भूमिपूजन

लातूर :- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची हमी गत १६ वर्षांपासून रखडलेल्या लातूर जिल्हा रूग्णालय या बहुप्रतिक्षित आस्थापनेच्या निर्मितीला वेग आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ११ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा रूग्णालय निर्मितीला मंजुरी देत असल्याची घोषणा केली तर राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी येत्या महिन्याभरात किंवा त्यापूर्वीच लातूरच्या प्रस्तावित जिल्हा रुग्णालय इमारतीचे भूमिपजन केले जाईल अशी हमी १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित शासकीय धजारोहण कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना दिली आहे. लातूर जिल्हा रुग्णालयाचा इतिहास मोठा रंजक आणि चकीत करणारा आहे. अस्तित्वात असलेली जिल्हा रूग्णालयाची इमारत १ ऑक्टबर २००८ साली उपलब्ध असलेल्या मनुष्यबळासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास वर्ग करण्यात आली. येत्या ३ ते ४ वर्षात जिल्हा रुग्णालयासाठी जागा शोधून नवीन जिल्हा रूग्णालय होणे गरजेचे होते त्या अनुषंगाने २०१२ साली राज्य सरकारने जिल्हा रूग्णालयास मान्यता देऊन बांधकामासाठी १२० कोटी रुपयांची तरतूद देखील केली होती. मात्र दुर्दैव यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात राज्यकर्ते, प्रशासन अपयशी ठरले. तब्बल ७ वर्षानंतर म्हणजेच १९ जुलै २०१९ रोजी तत्कालीन राज्य शासनाने जिल्हा रुग्णालयासाठी परभणी कृषी विद्यापीठ अंतर्गत लातूर कृषी महाविद्यालय येथील सर्वे क्रमांक ३७ मधील १० एकर जागा विशेष बाब म्हणून मंजूर केली आणि या जागेच्या हस्तांतरण पोटी आरोग्य विभागाने २ कोटी ८२ लाख रुपये कृषी विभागास मोबदला द्यावा असा शासन आदेश काढला. त्यानंतर आलेल्या कोरोना संकटात हा आदेश ५ वर्ष लालफितीत अडकून राहिला. ना शासनाने, प्रशासनाने, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष दिले हे दुर्दैवाने सांगितले पाहिजे. कोरोनासारख्या संकटात जिल्हा रुग्णालयाची कमतरता लातूर जिल्ह्याला प्रकर्षाने जाणवली. जिल्हा रूग्णालय असते तर जिल्ह्यातील अनेक गोरगरीब रुग्णांचे प्राण वाचले असते या विचाराने पुन्हा एकदा या मागणीने जोर धरला. सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या माझं लातूर परिवाराने यासाठीचा लढा उभारला. २ ऑक्टोबर २०२३ पासून लातूर शहरातील गांधी चौक येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर बेमुदत साखळी उपोषणाने हा बहुचर्चित आणि प्रलंबित विषय पुन्हा ऐरणीवर आला. ही मागणी रास्त असल्याची भूमिका घेत आमदार संभाजी पाटील निलंगेकर, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार अमित देशमुख, आमदार अभिमन्यू पवार, माजी खासदार डॉ सुनिल गायकवाड, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी महापौर दीपक सुळ, विक्रांत गोजमगुंडे, काँग्रेसचे ड किरण जाधव, मोईज शेख, राष्ट्रवादीचे राजा मणियार, मकरंद सावे, शिवसेनेचे ड बळवंत जाधव यांच्यासह जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, संघटनां आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी मागणीला जाहीर पाठिंबा दिला होता. एवढ्यावर न थांबता माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने मंत्रालय गाठून तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आरोग्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून निवेदने दिली आणि हा प्रलंबित विषय तात्काळ मार्गी लावावा अशी आग्रही मागणी केली. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांना भेटून पुढाकार घ्यावा असे आवाहन केले होते. या निरंतर पाठपुराव्याला अखेर १९ जून २०२४ रोजी यश मिळाले आणि ६० दिवसांच्या आत नियोजित जागा आरोग्य विभागाने ताब्यात घ्यावी असा शासन आदेश काढला. पण यावेळीही अनेक तांत्रिक अडचणी समोर आल्या. १९ जुलै २०१९ सालीचे जागेचे मूल्यांकन २ कोटी ८२ लाख होते पण आता २०२४ प्रमाणे मूल्यांकन आवश्यक होते याचाही पाठपुरावा करून जागेचे पुनर्मूल्यांकन करण्यात आले आणि आता या जागेचे ३ कोटी ६८ हजार ६५० असे मूल्यांकन जिल्हा प्रशासनाने निश्चित केले आणि तसा प्रस्तावही जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठविला. निधीच उपलब्ध नाही या सबबीखाली हा विषय पुन्हा लालफितीत अडकून राहिला. यासाठी नव्याने पाठपुरावा सुरू झाला नूतन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी या महत्वपूर्ण विषयाचे गांभीर्य लक्षात घेत यासाठी पुढाकार घेतला आणि अर्थसंकल्पात या निधीची तरतूद होईल याची दक्षता घेतली. अखेर १४ मे २०२५ रोजी आरोग्य विभागाने ३ कोटी ३२ लाख








६५० रुपये हस्तांतरण निधी कृषी विभागास वर्ग केला आणि २२ मे २०२५ रोजी ही जागा आरोग्य विभागाच्या ताब्यात आली. स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रथमच लातूरात आले यावेळी आयोजित कार्यक्रमात लातूर जिल्हा निर्मितीला आजच मान्यता देत असल्याची जाहीर घोषणा केली. त्यानंतर १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री भोसले यांनी एका महिन्याच्या आत नियोजित जिल्हा रुग्णालय इमारतीचे भूमिपजन सर्वांना सोबत घेऊन केले जाईल अशी हमी पत्रकारांना बोलताना दिली. एकंदरीत गेल्या २ महिन्यापासून शासकीय, प्रशासकीय स्तरावर या विषयाला मिळालेली गती आणि हालचाली पाहता लातूरकरांचे जिल्हा रूग्णालयाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल यात शंका राहिली नाही. या बहुप्रतिक्षित आणि बहुप्रलंबित विषयासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वस्तरातील मान्यवरांचे माझं लातूर परिवाराने आभार मानले आहेत. एखाद्या सामाजिक विषयासाठी निःस्वार्थ भावनेने, सनदशीर मार्गाने, निरंतर लढा आणि योग्य पाठपुरावा केल्यास यश निश्चित मिळते हे या जिल्हा रूग्णालय लढ्याने दाखवून दिले आहे.

## कर्मचाऱ्यांचे आणि शेतकऱ्यांचे थकीत पैसे मिळवुन देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देणार - मोहन गुंड

### पन्नगेश्वरच्या लढयात शेकापची उडी-अंदोलन तिव्र होणार

**बोळंगे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू**
शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांनी पन्नगेश्वर कारखान्याच्या सभासदांचे शेअर्स नियमीत करावेत कामगारांचे थकलेले पगार देऊन त्यांना कामावर घेण्यात यावे या व इतर मागण्यासाठी १४ ऑगस्ट पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.







रेणापुर / प्रतिनिधी :- मागिल दोन वर्षा पासुन बंद असलेल्या आणि कुणालाही विश्वासात न घेता परस्पर विक्री केलेल्या पानगांव ता. रेणापूर येथील पन्नगेश्वर साखर कारखाण्यातील शेतकऱ्यांच्या शेअर्सची रक्कम,कर्मचारी यांचा हक्काचा पगार,ऊसतोड कामगारांचे कष्टाचे संपूर्ण पैसे मिळवुन देणार असल्याचे आणि त्या करिता पैसे मिळे पर्यंत कर्मचारी,शेतकऱ्यां सोबत लढा देणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन गुंड यांनी कारखान्यावर सुरू असलेल्या अंदोलकाना मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले आहे. इ.स.१९९९ मध्ये स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी पन्नगेश्वर कारखाण्याची स्थापना केली तेव्हां पासूनकै.गोपीनाथराव मुंडे साहेब हयात असेपर्यंत कर्मचाऱ्यांचे पगार नियमीत होत होते.कारखाना बंद पडण्यापुर्वी तीन वर्षापासून कर्मचाऱ्यांचे पगार,ग्रॅज्युटी व पी.एफ बाबत अनियमीतता झाली.तसेच सदर कारखान्याकडे कर्मचाऱ्यांचे हक्काचे तीन वर्षाची पगार, ग्रॅज्युटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ( पी. एफ ) येणे बाकी आहे.त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.मुला बाळाचे लग्न मोडले, शिक्षणापासून मुल वंचीत राहण्याची वेळ आली. यामुळे कर्मचाऱ्यांनी पुर्वीच्या व्यवस्थापनाकडे वेळोवेळी निवेदन देऊन अनेक वेळा अंदोलने ही केली तरीपण त्यांच्या मागण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले व कोणासही माहिती न होऊ देता व कर्मचारी, कामगार यांच्या थकीत वेतनाची तरतुद न करता अंबाजोगाई येथील विमल ॲग्रो फुड्स प्रा. ली. या कंपनीस कवडीमोल किमतीत कारखान्याची विक्री केली गेली.येथील कामगार,कर्मचारी यांचे हक्काचे थकीत रक्कम न देता कारखान्याची विक्री व हस्तांतरण झाले आहे. या विरोधात कारखान्याच्या मुख्य गेटवर पन्नगेश्वर शुगर मिल्स या साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी १३ ऑगस्ट पासून साखळी उपोषण सुरू केले आहे.सोमवारी ता. १८ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन गुंड पाटील यांनी उपोषण स्थळी येत भेट देऊन कारखाण्यातील शेतकऱ्यांच्या शेअर्सची रक्कम,कर्मचारी यांचा हक्काचा पगार,ऊसतोड कामगारांचे कष्टाचे संपूर्ण पैसे मिळवुन देणार असल्याचे आणि त्या करिता पैसे मिळे पर्यंत कर्मचारी,शेतकऱ्यां सोबत लढा देणार असल्याचे शेतकरी नेते मोहन गुंड यांनी कारखाण्याच्या गेट समोर बेमुदत अंदोलन करणाऱ्या अंदोलकाना मार्गदर्शन करताना केले आहे.आता या अंदोलनात शेकापने उडी घेतल्याने हे अंदोलन अधिक तिव्र होणार आहे.

## पत्रकार संग्राम वाघमारे यांना साहित्यरत्न जीवनगौरव पुरस्कार जाहीर

चाकूर / प्रतिनिधी :- येथील पत्रकार संग्राम वाघमारे यांना ए.डी. फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे जीवनगौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. संग्राम वाघमारे यांनी पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून ए.डी फाऊंडेशनने एक आदर्श पत्रकार म्हणून त्यांची डॉ आण्णाभाऊ साठे साहित्यरत्न जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड केल्याचे ए.डी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यांनी पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार २३ ऑगस्ट रोजी हरिप्रिया मल्टीपर्पज हॉल, सांगली येथे आयोजित एका भव्य कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.



वाघमारे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवून उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले आहे. साहित्यरत्न जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल वाघमारे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते. तर तलवारीच्या तयांच्या, न्यारेच टोक असते.

## महाकवी वामनदादा कर्डक फुशाआ स्टडी सर्कलची १२७ वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्म सेवा संघ बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने जय भवानी नगर, एन-४, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे भीमा तुझ्या मताचे, जर पाच लोक असते. तर तलवारीच्या तयांच्या, न्यारेच टोक असते. या महाकवी वामनदादा कर्डक यांच्या चळवळीतील विधानावर जयंती व स्वातंत्र्य दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर १२७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १५ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, एकजिनसी भारतीय समाज निर्माण करण्यासाठी सर्व उपासक व नागरिकांना प्रशिक्षित केले पाहिजे. कधीतरी कुणाला काहीतरी बोलायचे असते पण त्याला कुणी संधीच देत नाही? करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सर्वांना संधी देऊन प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. नेतृत्वहीन समाजाला नेतृत्व प्रदान करणा-यांची दहा-दहा गटात विभागणी झाली असेल तर वामनदादा कर्डकानी व्यक्त केलेले भिमाच्या मतांची ती पाच लोक कुठे आहेत? कांबळे साहेबांनी म्हटल्याप्रमाणे समाजात फार विद्वान माणसे असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यात शील व सौजन्य नसल्याने ती समाजासाठी हिस्त्र पशु पेक्षाही धोकादायक ठरत आहेत.

कुठल्याही आशा आकांक्षाची पूर्तता होण्यासाठी किंमत मोजावी लागत असते. तर मग साऱ्यांना शासन शासनकर्ती जमात व्हावी, असे वाटत असेल तर मग त्याची आपण किंमत मोजत आहोत काय? समाजाला जागृत करून त्यांना त्यांचे हक्क अधिकार मिळावेत याकरिता लढा देण्यासाठी संघटित होणे आवश्यक असते





आणि ते संघटित होण्यासाठी संघर्ष करावा लागत असतो. त्यासाठी आपण कटिबद्ध आहोत काय? म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९२४ ला सुशिक्षित करा संघर्ष करा आणि संघटित करा असा त्रिसूत्री संदेश दिला असला तरी २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही दिल सोडू नका. असा पंचसूत्री संदेश दिला होता. अशाप्रकारे सुशिक्षित करणारी, संघर्ष करणारी, संघटित करणारी, आत्मविश्वास बाळगणारी व कधीही धीर न सोडणारी हीच ती पाच लोक आहेत, जी वामनदादा कर्डकांना अपेक्षित होती. त्यांचा आपण शोध घेतला पाहिजे. करिता समाजाला जागृत करण्यासाठी स्वातंत्र्यदिनी जयंती निमित्त सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या सविता अभ्यंकर म्हणाल्या की, देशाच्या स्वातंत्र्याला ७८ वर्षे झाली असली तरी देशातील माणसं मात्र अजूनही पारतंत्र्यातच असल्यासारखी पहायला मिळत आहेत. आदर्श विचारधारेला पुढे घेऊन जाताना बुद्धाची वाणी, कबीराचे दोहे, रमाईचे त्यागी जीवन, वामनाची लेखणी, बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान याची सांगड घातली पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना शाहीर उत्तमराव म्हस्के म्हणाले की, वामनदादांनी घराघरात गीताच्या माध्यमातून परिवर्तनवादी चळवळीचे विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले आहे. तसेच त्यांनी 'सारे मानव प्राणी एक व्हा रे', 'तुझीच कमाई आहे ग भिमाई' इत्यादी गीतांचा हवाला देऊन प्रबोधन केले आहे.

याप्रसंगी रमेश जोगदंड म्हणाले की, सामाजिक स्वातंत्र्य गरजेचे असताना शासकीय स्तरावर मर्यादा घालणे म्हणजे स्वातंत्र्याची गळचेपी होय. करिता आपण अंधारात चाचपडत न राहता प्रकाशाकडे वळले पाहिजे. अरविंद कांबळे म्हणाले की, चळवळीची वाहतात होत असल्याने समाजात निराशा पसरत चालली आहे. समाजात प्रचंड विद्वान माणसे असताना त्यांचा सर्व वेळ इतरांना नाव ठेवणे आणि दोष देण्यातच खर्च होत आहे. खऱ्या नेतृत्वाला नेस्तनाबूत करण्यासाठी शत्रूसह आपलीच दलाली करणारी बेइमान माणसे कार्यरत आहेत. उद्धव बनसोडे म्हणाले की, मान्यवर कांशीराम साहेबांनी समाजाला सत्तेत बसवून खरे कार्य केले आहे. भीम के लगते जिगर, आधे इधर आधे उधर या स्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पंडित बोर्डे म्हणाले की, बाबासाहेबांच्या सर्वांगीण विचाराचे पेरणी करणारे शिलेदार म्हणजे वामनदादा कर्डक होय. ती पाच माणसे कोण? याचा शोध घेतला तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात पुढारलेली माणसे होय. करिता शीलवान, गुणवान, कर्तुत्ववान, बुद्धिमान, प्रज्ञावान माणसं तयार केली पाहिजेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन एड. विलास रामटेके तर प्रास्ताविक व आभार गौतम पारखे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, आर. जी. देठे, अशोक सुरडकर, गोविंद वाहुळे, टी. एन. सोनवणे, डी. एस. सराटे, ए. ए. सोनवणे, रामदास अभ्यंकर, सिद्धार्थ बंनकर, रामभाऊ मते, डॉ. एस. के. जमधाडे, प्रल्हाद भदर्गे, प्रकाश जोगदंड, शंकर अंभोरे, अरुणाबाई भदर्गे, सुशीलाबाई गवई, आर. पी. गायकवाड, रजनीकांत दिवेकर, यशवंत कवडे, रमेश जोगदंडे, पंडितराव बोर्डे, चंद्रभान खंडारे, रावसाहेब सोनकांबळे, बुद्धभूषण साळवे, आराध्या सोनकांबळे, पद्मिनी कवडे, शारदा जमदाडे, नेहा आठवले, निर्मला सोनवणे, सुषमा मते, कुशीवार्ता सोनकांबळे, अनामी मोरे, रमेश साळवे, अरविंद कांबळे, विजय बचके इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# संपादकीय

## शैक्षणिक भरारी घ्यायची तर...

भारताला २०२७ पर्यंत शिक्षण क्षेत्रात मजबूत स्थितीत उभे राहायचे असेल, तर नियोजनबद्धरीतीने वाटचाल करावी लागेल. कोठारी आयोगाने १९६४–६६ मध्ये म्हटल्यानुसार, जीडीपीत ६ टक्के खर्च शिक्षणावर होणे अपेक्षित आहे. आजपर्यंत हा खर्च चार टक्क्यांपर्यंतही पोहोचलेला नाही. आज परिस्थितीत बदल झाला असला, तरी केंद्रीय विद्यापीठ अद्याप आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. मुद्दा केवळ खर्च आणि गुंतवणुकीचा नसून, शिक्षण क्षेत्रातील एक दूरदर्शी नेतृत्व आणि सुशासनाच्या अभावाचा आहे.

मौलाना अबुल कलाम आझाद यांनी उच्च शिक्षण हे राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक असल्याचे म्हटले होते. उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना प्रगतिशील ज्ञान आणि कौशल्य प्रदान करते आणि यानुसार त्यांना देशाच्या विकासात योगदान करण्यात सक्षम करते, असे आझाद यांनी म्हटले होते. शिक्षणतज्ज्ञांनी आणि थोर नेत्यांनी भारतातील शिक्षण व्यवस्थेबाबत वेळावेळी भाष्य केले आहे. आजचे तज्ज्ञही शिक्षण क्षेत्राची व्याप्ती वाढावी, दर्जा उंचवावा आणि देशाच्या विकासाला चालना मिळावी, अशी अपेक्षा बाळगतात. यानुसार शिक्षण व्यवस्था अंमलात आणावी, असे बोलले जाते. विकासाचा मुद्दा येतो तेव्हा शिक्षण क्षेत्राला वगळता येत नाही. २०४७ मध्ये सर्वंकष रूपातून विकसित होण्याचे स्वप्न साकार करू तेव्हा शिक्षण व्यवस्थाही विकसित झालेली असेल; पण हे स्वप्न कसे साकार होणार, आपण कोणते आणि कसे पाऊल टाकतो, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

भारताला २०४७ पर्यंत शिक्षण क्षेत्रात मजबूत स्थितीत उभे राहायचे असेल, तर नियोजनबद्धरीतीने वाटचाल करावी लागेल. प्रत्येक शाळेकडे स्वत:ची इमारत असायला हवी आणि यासाठी युद्धपातळीवर काम करायला हवे. प्राथमिक शाळांतही पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. या माध्यमातून विद्यार्थी आकर्षित होतील. या कृतीने प्राथमिक पातळीवरच उच्च शिक्षणाला पोषक वातावरण तयार होऊ शकते.

भारतात सध्या एकच प्रश्न विचारला जातोय की, उच्च शिक्षणात सकल नामांकन दर (जीईआर) कसा वाढवता येईल? सध्या उच्च शिक्षणात 'जीईआर' हा २८ टक्के आहे. २०३० पर्यंत सरकार उच्च शिक्षणातील 'जीईआर'ला ५० टक्क्यांपर्यंत नेऊ इच्छित आहे. यासाठी शालेय शिक्षणाची व्याप्ती वाढवावी लागेल. बारावीनंतर विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वाटचाल करतात. यानुसार अधिकाधिक मुले शालेय शिक्षण पूर्ण करतील, तेव्हा तेवढ्याच प्रमाणात उच्च शिक्षणात प्रवेशाची शक्यता अधिक राहील. मात्र, ही जबाबदारी खासगी संस्थांमार्फत पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्याचवेळी सरकारी शैक्षणिक संस्था दोन प्रकारच्या आव्हानांचा मुकाबला करत आहेत. पहिले म्हणजे, नवीन सरकारी संस्थांची निर्मिती होताना दिसत नाही आणि दुसरे म्हणजे, उपलब्ध संस्थांत चांगले शिक्षण, स्रोत आणि सुविधांकडे पुरेशा प्रमाणात लक्ष दिले जात नाही. सरकारी आणि खासगी शिक्षण संस्थांतील वाढती दरी हे एक आव्हानच आहे.

देशात परकी विद्यापीठांची संख्या वाढणार आहे. शिक्षणमंत्र्यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, आगामी काळात ५० परकी विद्यापीठे भारतात येण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे परकी संस्थांना कोणत्या नियमांच्या आणि अटींच्या माध्यमातून आणले जात आहे? हा प्रश्न आहे. त्यांची जबाबदारी आणि कर्तव्ये काय असतील? परकी संस्था केवळ फायदा कमावण्यासाठी येत तर नाहीत ना? हेदेखील पाहिले पाहिजे. वास्तविक, विकसनशील देशास विकसित करायचे असेल, तर शिक्षण आणि उच्च शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. आज परिस्थितीत बदल झाला असला, तरी केंद्रीय विद्यापीठ अद्याप आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. मुद्दा केवळ खर्च आणि गुंतवणुकीचा नसून, शिक्षण क्षेत्रातील एक दूरदर्शी नेतृत्व आणि सुशासनाच्या अभावाचा आहे. शिक्षण क्षेत्रात दूरदर्शीपणा असणे आवश्यक आहे. काळानुसार लक्ष्य निश्चित करणे आवश्यक आहे.

# प्रश्न अनुत्तरितच!


देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत काँग्रेसकडून सुरू असलेल्या आरोपांबाबत आपली भूमिका मांडली. ज्ञानेश कुमार यांच्या या पत्रकार परिषदेविषयी देशभर उत्सुकता होती, पण त्यात त्यांनी जी भूमिका मांडली ती सरळ सरळ पक्षपातीपणाचीच दिसली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावर जे आक्षेप घेतले जात आहेत त्या आक्षेपांपैकी एकालाही समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे ही पत्रकार परिषद केवळ निराशाजनकच नव्हे; तर प्रचलित वादात आणखीनच नवीन प्रश्नांना जन्म देणारी ठरली. राहुल गांधी यांनी बंगळुरू मध्य लोकसभा मतदारसंघातील गैरप्रकाराच्या संबंधात पुराव्यासह आरोप केले आहेत.


त्या लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणार्या एकूण सात विधानसभा मतदारसंघांपैकी सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसला बढत आहे आणि केवळ एकाच मतदारसंघात भाजपला इतकी मोठी बढत मिळाली आहे की त्यात त्यांनी बाकीच्या मतदारसंघात झालेली पिछाडी भरून काढून काँग्रेस उमेदवारावर तब्बल ३५ हजार मतांनी मात केली आहे. एकूण पाच प्रकारे त्या मतदारसंघांमध्ये मतदानाचा घोळ झाला आहे, याला काँग्रेसचे नेते मतदानाची चोरी असे म्हणाले आहेत. अशीच चोरी देशभरातील अनेक मतदारसंघांमध्ये झाली असून त्याद्वारे भाजपाने गैरमार्गाने केंद्रातील सत्ता मिळवली असल्याचा आरोप आहे.

या सगळ्या आरोपांविषयी एव्हाना सगळ्यांना कल्पना आली आहे. ज्या दिवशी निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद झाली त्याच्या आदल्या दिवशीच निवडणूक आयोगाने एक प्रेस नोट जारी केली होती. लागोपाठ दुसर्या दिवशी त्यांनी एक जाहीर पत्रकार परिषदही घेतली, पण या दोन्ही वेळेला मूळ आक्षेपाला कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. उलट यावेळी पत्रकारांकडून जे टोकदार प्रश्न विचारले गेले त्या प्रश्नांना थेट उत्तर देण्याचेही मुख्य निवडणूक आयुक्तांनी टाळले. त्यामुळे एकूणच हा सारा प्रकार नुसता फार्सच ठरला नाही तर, निवडणूक आयोग कोणाच्या इशार्यावर काम करतो आहे हे संपूर्ण देशापुढे स्पष्ट झाले आहे. ज्ञानेश कुमार यांनी दिलेली उत्तरे इतकी मासलेवाईक आहेत की ती ऐकताना कोणालाही हसूच येईल.

विरोधी पक्षांनी मतदान प्रक्रियेचे सीसीटीव्ही फुटेज मागितले आहे, ते नाकारताना ज्ञानेश कुमार असे म्हणाले की, हे सीसीटीव्ही फुटेज दिले तर मतदानात सहभागी झालेल्या आपल्या माता, भगिनी आणि महिलांचे चित्रीकरण खुले करावे लागेल, त्यातून महिला मतदारांचे खासगी चित्रण बाहेर येईल. त्यामुळे हे सीसीटीव्ही फुटेज मी कसे देऊ, असा पोरकट प्रतिवाद करताना ते दिसले. वास्तविक त्यांच्या याच एका मुद्द्यावर देशभरातून जोरदार टीका सुरू आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे मशीनरीडेबल मतदार यादी मागितली आहे, पण त्यात विरोधी पक्षांकडून फेरफार होण्याची शक्यता असल्याने अशी यादी देता येणार नाही, असाही पवित्रा त्यांनी घेतला आहे. ही सगळी उत्तरे ऐकल्यानंतर निवडणूक आयोग पक्षपातीपणे वागते आहे हे तर स्पष्टच होते आहे, एवढेच नव्हे तर ते संपूर्ण देशालाच मूर्ख समजू लागले आहेत काय असाही प्रश्न त्यातून निर्माण होतो.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर जे आक्षेप घेतले त्या संदर्भात राहुल गांधी यांनी सात दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करावे अन्यथा निवडणूक आयोगाची माफी मागावी, याखेरीस तिसरा पर्याय आमच्या पुढे उपलब्ध



नाही, असेही ज्ञानेश कुमार म्हणाले आहेत. वास्तविक राहुल गांधी यांनी केवळ एका मतदारसंघातील बोगस मतदानाचे पुरावे सादर केल्यानंतर भाजपाने अनुराग ठाकूर यांना राहुल गांधी यांच्या विरोधात मैदानात उतरवले आणि अनुराग ठाकूर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचा विजय झालेल्या सहा मतदारसंघात किती बोगस मतदान झाले याची आकडेवारी सादर केली.

म्हणजेच राहुल गांधी यांनी जो आरोप केला तशाच स्वरूपाचा आरोप केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी निवडणूक आयोगावर केला आहे. ज्या आरोपांबाबत निवडणूक आयोग राहुल गांधी यांच्याकडे शपथपत्र मागते तसेच शपथपत्र केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्याकडून का मागवले जात नाही या प्रश्नालाही मुख्य निवडणूक आयुक्तांकडे उत्तर नाही. हा सगळा विषय आता पोरकटपणाच्या पातळीवर गेला आहे. त्यातून निवडणूक प्रक्रियेविषयीचे शंकानिरसन होण्याऐवजी देशातील ही सगळी निवडणूक प्रक्रियाच संशयाच्या गर्तेत सापडली असून त्याविषयी जनतेच्या मनात मोठाच असंतोष खदखदू लागला आहे. ही परिस्थिती निवडणूक आयोगामुळेच उद्भवली आहे, हे नाकारता येणार नाही. बिहारमधील मतदार यादी गहन पुनर्निरीक्षणासंबंधात जे आक्षेप आहेत त्याच्या विरोधात राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी रविवारपासून बिहारमध्ये एक मोठी प्रचार यात्रा सुरू केली आहे.

रविवार होता आणि नेमक्या त्याच दिवशी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन विरोधी पक्षांवर जे हल्ले चढवले त्याच्या टायमिंगविषयीही आक्षेप नोंदवले गेले आहेत. भाजप हेडलाइन मॅनेजमेंटसाठी ज्या वेगळ्या कल्पना राबवते तसाच हाही प्रकार होता असे लोकांना वाटू लागले आहे. भाजप एक सत्ताधारी राजकीय पक्ष आहे, ते त्यांच्या निवडणूक रणनीतीचा भाग म्हणून कोणतीही कृती करू शकतात, पण निवडणूक आयोगही भाजपच्या निवडणूक रणनीतीचा भाग कसा काय बनू शकतो हा मुख्य प्रश्न आता निर्माण झाला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या या भूमिकेच्या विरोधात विरोधी पक्षाचे नेते आता महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या विचारात आहेत. अर्थात त्यांनी तो मांडला तरी संख्याबळाच्या आधारे तो फेटाळला जाईल हे जरी खरे असले तरी याद्वारे निवडणूक आयोग आणि देशातील विरोधी पक्ष यांच्या संघर्षाची व्याप्ती वाढत जाणार आहे आणि त्यातून देशातल्या लोकशाहीवरच प्रश्नचिन्ह लागणार आहे हे मात्र खरे.

# भारत विरोधी धोरणाची परिसीमा

गेल्या काही दिवसांपासून भारत व अमेरिकेच्या संबंधात तणाव निर्माण झाला आहे. अमेरिकेच्या हुकूमशाही वागण्याने हा तणाव वाढण्याची शक्यता बळावत आहे.

भारत अमेरिकेच्या संदर्भात वाढत्या तणावाची संभाव्य चार कारणे समोर येतात. १) कॅनडातील जी ७ च्या परिषदेच्या नंतर अमेरिकेने नरेंद्र मोदींना अमेरिका भेटीचे दिलेले आमंत्रण पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे मोदींनी नाकारले. २) भारत–पाक दरम्यान झालेल्या अल्प सशस्त्र संघर्षात आपणच मध्यस्थी करून संघर्ष थांबवला हा त्यांनी केलेला दावा भारताने नाकारला. ३) अमेरिकेने धमकी दिल्यानंतरही भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद केली नाही. ४) भारताने अमेरिकेला भारतात व्यापार करण्यासाठी कृषी क्षेत्र व दुग्ध व्यवसायाचे क्षेत्र मुक्त केले नाही.

आपल्या धोरणाप्रमाणे ऐकत नाही या बाबीचा राग येऊन भारताला दबावात आणण्यासाठी अमेरिकेने व्यापारसंबंधी बोलणी पूर्ण होण्यापूर्वीच अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लावून एकूण ५० टक्के केले आहे. यावरून भारताला दबावात आणून आपल्या इच्छेप्रमाणे वागावे व धोरणे ठरवावी ही अमेरिकेची हुकूमशाही वृत्ती दिसून येते. तसेच यातून भारत विरोधही स्पष्ट दिसत आहे. मात्र, अमेरिकेचे भारत विरोधी धोरण केवळ वरील कारणामुळेच आहे असे नसून अमेरिका प्रथमपासूनच भारत विरोधात आहे. हे मागील काही घटनांकडे दृष्टिक्षेप टाकला असता स्पष्टपणे जाणवते.

भारताचे विभाजन होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यावेळेस दुसरे महायुद्ध संपून जगात अमेरिका व रशियाधार्जिणे असे दोन गट पडले होते. पाकने अमेरिकन गटाशी सख्ख्य केले, तर भारताने तटस्थतेचे धोरण स्वीकारून दोन्ही गटापासून दूर राहिला. स्वाभाविकच पाककडे अमेरिकेचे झुकते माप राहिले. तसेही अमेरिकेला दक्षिण पूर्व आशियात कम्युनिस्टांच्या वाढत्या विचारधारेला व प्रसाराला आळा घालण्यासाठी आशियात एखाद्या सैनिकीस्थळाची आवश्यकता होती व पाकच्या रूपाने तो त्यांना मिळाला. सोव्हिएत संघाच्या वाढत्या प्रभावाला आळा घालण्यासाठी १९५४ मध्ये सेटो व १९५५ मध्ये सेंटो या संघटना निर्माण झाल्या. पाक त्या संघटनांचा सभासद झाला. त्यामुळे तर तत्कालीन अमेरिकन विदेश मंत्र्यांनी दक्षिण आशियात आम्हाला एक चांगला लढाऊ साथीदार पाकच्या रूपाने मिळाला, असे उद्गारही काढले.




१९५७ ते १९७० च्या दरम्यान अमेरिकेने पाकला २१ बिलियन डॉलर म्हणजे आजच्या हिशेबात जवळपास १.८ लाख करोड रुपयांची मदत केली. यात ३४ हजार करोडची शस्त्रे व सैन्य सहाय्यता होती. याच मदतीचा उपयोग पाकिस्तानने भारत विरुद्धच्या १९६५ च्या युद्धात केला. या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला भारत विरुद्ध त्याकाळी अमेरिकेचे अभेद्य समजले जाणारे पॅटर्न रणगाडेही पुरविले होते. १९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तानात पाक सेनेने जनतेवर केलेल्या अत्याचाराच्या विरोधात जनतेने सशस्त्र उठाव केला. पाकच्या अत्याचाराने अनेक निर्वासितांचे लोंढे भारतात आले. त्यामुळे भारतावर आर्थिक बोजा पडू लागला. त्यामुळे भारताने पूर्व पाकिस्तानवर कारवाई करण्याचे ठरविले.

भारताच्या या पवित्र्यामुळे अमेरिकेचे तत्कालीन प्रेसिडेंट रिचर्ड निक्सन यांनी पाकचे दोन तुकडे करण्यापासून भारताला थांबविले पाहिजे, असे म्हणून आपले परमाणुयुक्त सुसज्ज असे सातवे आरमार बंगालच्या खाडीत पाठविले. हा सरळ सरळ भारताला धमकावण्याचा प्रकार होता व भारताविरुद्ध प्रत्यक्ष संघर्षाचा पवित्रा होता. मात्र, रशिया भारताच्या बाजूने खंबीरपणे उभा असल्याने भारताने त्याला भीक घातली नाही व पाकिस्तानचे दोन तुकडे करून बांगलादेशची निर्मिती केली. मात्र, अमेरिकेचा हा पराभव होता. तसेच पॅटर्न रणगाड्यांच्या विध्वंसामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारात त्याच्या विश्वासार्हतेलाही तडा गेला.

१९७४ मध्ये भारताने आपला अणुबॉम्बचा स्फोट केला. त्यामुळे विस्मयचकित झालेल्या अमेरिकेने भारतावर कडक निर्बंध लादले. न्यूक्लिअर ग्रुप तयार करून भारताला परमाणू तंत्रज्ञान मिळू नये याची दक्षता घेतली. मात्र, त्याच वेळेस पाकच्या परमाणू विकास कार्यक्रमाबाबत मौन बाळगले. इतकेच नव्हे तर शांततेसाठी अणुविज्ञान या नावाखाली पाक शास्त्रज्ञांना प्रशिक्षणही दिल्याची त्यावेळी चर्चा होती. १९७९ मध्ये रशियाने अफगाणिस्तानवर हल्ला केला. त्यामुळे रशिया विरुद्ध लढण्यासाठी व डावपेच आखण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानची मदत घेतली. अमेरिकेने पाकमध्ये आपला तळ बनविला. अफगाणिस्तानमध्ये असंतोष निर्माण करण्यासाठी व घातपाती कारवाया करण्यासाठी अफगाण मुजाहिदिनसाठी पाकिस्तानला अमेरिकेने मोठ्या प्रमाणात शस्त्र व अर्थसहाय्य केले.

खरबो रुपयांचे अर्थसहाय्य व शस्त्रपुरवठा केला. मुख्य उद्देश अफगाणिस्तानमधून रशियाला हुसकावणे हा असला तरी पाकिस्तानने या सोबतच याचा उपयोग भारताविरुद्ध दहशतवाद्यांसाठी प्रशिक्षण केंद्रे उभारून त्याद्वारे दहशतवादी तयार करून त्यांना काश्मिरात पाठवून काश्मिरात अशांतता व उच्छाद मांडण्यासाठी केला. अमेरिकेने दिलेल्या मदतीचा व शस्त्रांचा उपयोग पाकिस्तान भारताविरुद्ध व काश्मिरात अशांतता निर्माण करण्यासाठी करीत असल्याचे भारताने वेळोवेळी अमेरिकेच्या निदर्शनास आणून दिले. हे सर्व अमेरिकेपासून लपून नव्हते. मात्र, स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी अमेरिका तिकडे कानाडोळा करीत राहिली.


१९९८ मध्ये भारताने पाच परमाणू परीक्षण केले. तेव्हाही अमेरिकेने भारतावर पुन्हा कडक निर्बंध लादून भारतीय परमाणू कंपन्यांना काळ्या यादीत टाकले. जेणेकरून कोणत्याही परदेशी कंपन्यांकडून भारताला तंत्रज्ञान मिळू नये. मात्र, थोड्याच दिवसांत पाकनेही परमाणू परीक्षण केले. त्याकडे मात्र अमेरिकेने दुर्लक्ष केले. यावरून भारत अण्वस्त्रसंपन्न होऊ नये अशीच अमेरिकेची इच्छा व कारस्थान असल्याचे स्पष्ट होते. दुसर्या कार्यकाळात सुरुवातीपासूनच ट्रम्प हुकूमशहासारखे धोरण आखत आहेत. सर्वच देशांवर प्रथम भरमसाठ आयात शुल्क आकारून नंतर त्यांच्याशी करार करून त्यात काही प्रमाणात सवलती दिल्या. मात्र, भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावले. ब्रिक्स गटातील देशांनाही आयात शुल्काच्या व अर्थव्यवस्था बरबाद करण्याच्या धमक्या दिल्या. अमेरिकेने भारताची अर्थव्यवस्था ही मृत अर्थव्यवस्था असल्याचे म्हटले.

पाकिस्तानात अल्प प्रमाणात तेलसाठा सापडला आहे. हा तेलसाठा पाकिस्तानच्या गरजेपेक्षाही कमी आहे. मात्र, याचा विकास करण्यासाठी अमेरिका पाकिस्तानला सहकार्य करेल, असे अमेरिकेने जाहीर केले आहे. या अल्पशा तेलसाठ्यावरूनच पुढे मागे भारतालाही पाकिस्तानकडून तेल घ्यावे लागेल, अशी स्वप्ने ट्रम्प प्रशासन पहात आहे. ही अमेरिकेच्या भारत विरोधी धोरणाची परिसीमा म्हणावी लागेल.

# अनधिकृत व अडथळा असणारे युनिपोल /होर्डिंगज मनपा लातूर यांनी काढण्यात यावे. लोक प्रहार संघटनेची मागणी

## युनिपोल/होर्डिंग माफियांचा गोंधळ जनतेच्या जीवावर!






लातूर :- युनिपोल/ होर्डिंग काढण्यासाठी महापालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचललेले नाहीत . मनपा केवळ होर्डिंगचा कर गोळा करत आहे, पण जनतेच्या सुरक्षिततेबद्दल मात्र पूर्णपणे उदासीन आहे. लातूर महानगरपालिका अधिकारी, अतिक्रमण विभाग, मालमत्ता विभाग, संबधित युनिपोल कंत्राटदार यांच्या गलथान कारभारामुळे रस्त्यावरील डीव्हायडरच्या मधोमध अर्धवट युनिपोलच्या अर्धवट कठड्यावर अपघात होऊन पडून एका युवकाचा मृत्यू झाला होता.
याला जबाबदार मनपा असून त्या ठिकाणी कसलेच संरक्षण नव्हते. याची चौकशी समिति नेमून संबंधित विभाग, संबधित युनिपोल कंत्राटदार यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. न्यायालयाच्या आदेशानंतर शहरातून अनधिकृत होर्डिंग हटवण्यात आले होते. परंतु आता पुन्हा युनिपोलच्या नावाखाली मुख्य रस्त्यांवर जाहिरात माफियांचा कब्जा वाढला आहे . मुख्य रस्ते नागरिकांसाठी आहेत की जाहिरातींसाठी, हा प्रश्न आता लातूरकर विचारत आहेत.
शहरभर ठिकठिकाणी फुटा-फुटावर उभे केलेले युनिपोल कोणत्या निकषांनुसार लावले गेले? याचे कोणतेही स्ट्रक्चरल ऑडिट जनतेसमोर सादर केलेले नाही. युनिपोल किती उंचीचे, किती अंतरावर, कोणत्या साईजचे असावेत याचे कोणतेही नियम मनपा स्पष्ट करत नाही . उद्या हे युनिपोल कोसळल्यास त्याला जबाबदार कोण? ही जनतेच्या मनात असलेली मोठी शंका आहे.
यापुढे होणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेसाठी मनपाच जबाबदार असणार का? की पुन्हा बेवारस म्हणून हात झटकले जाणार ?यामुळे लातूरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मनपा आणि जाहिरात माफियांचे संगनमत आता जनतेच्या जीवावर बेतू नये, यासाठी तातडीने उपाययोजना आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.यासंदर्भात लातूर मनपा आयुक्त /उपायुक्त पंजाबराव खानसोळे साहेब यांना लोक प्रहार संघटना तर्फे निवेदन देण्यात आले. यावेळी लोक प्रहार संघटना संस्थापक अध्यक्ष अजयभाऊ सूर्यवंशी व रोहित सोनवणे युवा जिल्हाध्यक्ष लोक प्रहार संघटना, अमोल सुरवसे, महेश सावंत,आकाश जाधव, राहुल राठोड, जयपाल लोखंडे,अवी कदम,बालाजी जाधव, उपस्थित होते.

# सीमेवरील शांततेने चीन खूश ! परराष्ट्र मंत्री वांग यी-अजित डोभाल यांच्यात भेट ; चीनने भेटीविषयी काय म्हटले?

अमेरिकेसोबतच्या टॅरीफवरून सुरू असलेल्या तणावादरम्यान, भारताला शेजारी देश चीनकडून दिलासा मिळाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण सध्याच्या वातावरणावरून दोन्ही देशांमधील संबंध सुधारत असून सीमेवर स्थिरता निर्माण होत आहे. त्यातच चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल यांच्यात आज भेट झाली. या भेटीदरम्यान संबंधांमध्ये सुधारणा होण्याची चिन्हे दिसून आली. भेटीदरम्यान, चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी, आता सीमेवर स्थिरता निर्माण झाल्याचा त्यांना आनंद आहे. भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्याची हीच योग्य वेळ आहे असेही त्यांनी सांगितले. यामुळे दोन्ही देशांच्या विकासाला गती मिळेल.वांग यी भारताच्या दौऱ्यावर आहेत आणि त्यांनी आज राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासोबत एक महत्त्वाची बैठक घेतली. यादरम्यान, अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. बैठकीदरम्यान वांग यी यांनी, गेल्या वर्षाच्या अखेरीस विशेष प्रतिनिधींच्या चर्चेचा २३ वा टप्पा खूप चांगला होता. त्या बैठकीत आम्ही मतभेद सोडवण्यासाठी आणि सीमांवर स्थिरता राखण्यासाठी सहमती दर्शवली, जी महत्त्वाची ठरली. आम्ही विशेष उद्दिष्टे देखील निश्चित केली. आता सीमांवर स्थिरता निर्माण झाली आहे ही आनंदाची बाब आहे.असे त्यांनी म्हटले.वांग यांनी अजित डोवाल यांचे कौतुक का केले ? चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी अजित डोवाल यांचे कौतुक करताना, भारतीय बाजूचे विशेष प्रतिनिधी म्हणून मी तुमच्या (अजित डोवाल) प्रयत्नांचे कौतुक करतो. आता आपल्याकडे द्विपक्षीय संबंध सुधारण्याची आणि विकसित करण्याची एक महत्त्वाची संधी आहे.असे त्यांनी म्हटले. अमेरिकेपासून दूर असताना चीन भारताच्या जवळ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या भारतावर नाराज आहेत.

# खासदाराच्या माजी नगरसेवकाचा महाप्रताप २५ गुंठे जमीन न दिल्याने केले उपोषण

### २५ गुंठे गायरान जमीन हडप करायला केज येथील मोठ्या हस्तीचा हात का?-कार्यकर्त्यांचा सवाल



केज/प्रतिनिधी खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक माजी नगरसेवकाचा महाप्रताप २५ गुंठे जमीन न दिल्याने उपोषण केले होते. २५ गुंठे गायरान जमीन हडप करायला केज येथील मोठ्या हस्तीचा हात का? असा सवाल पत्रकार परिषदेत दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे व या पत्रकार परिषदेत सर्वे नंबर ३०/२ मधीलगायरानजमीनबळकवण्याचासंवाद ऑडिओ क्लिप व्हायरल करून खासदार सोनवणे यांचे खंदे समर्थक माजी नगरसेवक कपिल मस्केचा महाप्रताप उघडकीस आणला आहे. सदर समितीचे पदाधिकारी खासदार सोनवणे यांची येत्या दोन दिवसात भेट घेऊन सदर प्रकरणाचा जाब विचारणार आहेत असे पत्रकार परिषदेमध्ये बोलताना पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. गेल्या कित्येक वर्षापासून केज- बीड रोडवरील रमाई नगर वस्तीसाठी केज तालुका दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीसह दलित चळवळीतील युवक व कार्यकर्ते आणि समाज बांधवांचा संघर्ष चालू आहे. पाठीमागील काही महिन्यापूर्वी सदर समितीच्या कार्यकर्त्यांनी रमाई नगर येथील नागरिकांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केला परंतु प्रशासन स्तरावरून कसल्याच प्रकारे रमाई नगरवासी यांना न्याय मिळाला नाही म्हणून सदर समितीच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयात आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला त्यानंतर सदर प्रकरणी तहसीलदार यांनी दखल घेऊन रमाई नगर येथील अतिक्रमण काढण्याचे स्थगित केले. परंतु खासदार सोनवणे यांचे खंदे समर्थक माजी नगरसेवक कपिल मस्के यानी ही अनधिकृत जमीन आपल्या नावाने करून घेण्यासाठी अनाधिकृत जमीन मलाक यांना सर्वे नंबर ३०/२ मधील गायरान जमीन २५ गुंठे दे व आपण दोघे मिळून खाऊ आशा आशयाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिप मध्ये माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी अनधिकृत मालक यांच्याशी २५ गुंठेवर सदर डिल केली परंतु मान्य न झाल्यामुळे माजी नगरसेवकाने आमरण उपोषण केले असा आरोप दलित संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी शासकीय विश्रामगृह केज येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केला या अगोदर असेच उपोषण करून ५० हजार रुपये घेतल्याची ऑडिओ क्लिप आजच्या पत्रकार परिषदेत लखन हजारे, अशोक गायकवाड, रोहित कसबे, शरद धीवार यांनी पत्रकार परिषदेत वाजवून दाखवली यावरून असे दिसून येते की,केज शहरातील माजी नगरसेवक यांच चाललय तरी काय? या मागे केज शहरातील मोठ्या हस्तीचा हात आहे काय? तसेच मोठ्या हस्तीचा हात असल्याचेही दबक्या आवाजात बोलले जात आहे. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना दलित अत्याचार निर्मुलन संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी बोलताना सांगितले की,आपल्या जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या प्रचार दरम्यान याच माजी नगरसेवकाने रमाई नगर भागातील लोकांना आश्वासित केले होते की, खासदार बजरंग बप्पा निवडून आल्यानंतर या जमिनी आपल्या रेकॉर्डला लावून घेऊ असा शब्द दिला परंतु बजरंग सोनवणे खासदार होऊन दीड वर्षे झाले तरी या जागेचा कुठल्याही प्रकारे निर्णय न लावता माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी स्वतःच्या फायद्यासाठी गोरगरीब जनतेला वेड्यात काढून वेठीस धरत राजकारण करत आहे.रामाई नगर वासियांना गायरान जमीन नावावर करून देण्याचे गाजर दाखवून राजकारण करत आहे व राजकारणामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि स्वतःच्या फायद्यासाठी माजी नगरसेवक कपिल मस्के हा गायरान जमीन हडप करण्याचा प्रयत्न करीत आहे. संबंधिताना सोबत घेऊन राजकारण करीत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी बोलताना केला आहे. सदर गायरान जमीन हडप करण्याच्या उद्देशाने त्या नगरसेवकाला आक्काच्या आदेशाने आमरण उपोषणाला बसायला लावले होते काय? असे व्हायरल ऑडिओ क्लिप पाहून व ऐकून शहरातील नागरिकांतुन दबक्या आवाजात ऐकण्यास मिळत होते व तशा जोरदार चर्चा चालू होत्या. सदर ऑडिओ क्लिप हि प्रसार माध्यमावर वाऱ्यासारखी व्हायरल झाल्यामुळे केज शहरासह तालुक्यात उलट सुलट चर्चेला उद्यान आले आहे.

# मनपा कर्मचारी गणेश मंडळाचे अध्यक्ष बालाजी शिंदे, उपाध्यक्षपदी धोंडीबा सोनवणे तर सचिव गणेश यांची निवड






लातूर /प्रतिनिधी : - १९ ऑगस्ट रोजी लातूर शहर महानगरपालिका कर्मचारी गणेश मंडळाची बैठक गणेश चौधरी अग्निशमन अधिकारी यांच्या अध्यक्षखाली आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीस रवि कांबळे, शुभम बावणे, पवन सुरवसे, असलम शेख, दिपक पवार, व्यंकट हिरास, पंडीत पवार, बालाजी गायकवाड, अगंद शिंदे, अभिषेक माळवे, ईश्वर घोलप, भाग्यवंत पवार, मनोज लोखंडे, सय्यद बाबू, कैलास भगनुरे, नवनाथ लोखंडे, महेश शर्मा इत्यादी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.
सदरील बैठकीत सर्वानुमते श्री बालाजी काशिनाथ शिंदे, भांडारपाल यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली. तर उपाध्यक्ष- धोंडीबा सोनवणे, पंडीत लोहारे, राधीका गडदे सचिव गणेश चौधरी, सहसचिव - कैलास मुद्दे, रोहीत पवार, अनुराधा देवकते, छाया आकाडे कोषाध्यक्ष- चंद्रकांत बावगे, मिरवणूक प्रमुख - व्यंकट हिरास, संतोष ठाकूर, पवन सुरवसे संघटक- पंडीत पवार, रणदावणी पवार, संजय महापूरे भोजन प्रमुख- महेश शर्मा, हणमंत जाधव, जगन्नाथ पवार, शाम तापकिरे सल्लागार - रमाकांत पिडगे, कलीम शेख, नंदकिशोर तावडे, खदीर शेख, बंटी राजूरे, समाधान सुर्यवंशी, बंडू किसवे, संतोष लाडलापूरे, अभिमन्यू पाटील व रुमानंद वडगावे, जरीचंद तापकीर यांची निवड करण्यांत आली तर बैठकीचे आभार प्रदर्शन दिपक पवार यांनी करुन बैठक खेळीमेळीत संपन्न झाली.

# लातूर जिल्हा प्रशासन दखल घेत नसल्याने उपोषणार्थी गजानन बोलंगे यांचे चिखलात दंडवत घालत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



लातूर -बंद पडलेल्या पंनगेश्वर साखर कारखान्यानी शेतकऱ्यांचे शेअर्स परत करावेत, मनरेगा कुशल योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्यावर कारवाई करावी या व अन्य मागण्यासाठी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोलंगे यांनी शेतकऱ्यांसाह १४ ऑगस्ट पासून लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. मात्र या उपोषणाला ६ दिवस झाले तरी जिल्हाधिकारी प्रशासनाने दखल घेतली नाही. म्हणून उपोषणाने प्रकृती खालावलेल्या गजानन बोलंगे यांनी आज १९ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयच्या प्रांगणात पडत्या पावसात चिखलात दंडवत घालत आंदोलन केले. जोपर्यंत मागण्याची दखल घेणार नाहीत, तो पर्यंत उपोषण सोडणार नाही, असा ठाम इशारा बोलंगे यांनी दीला आहे. यावेळी शेतकरी संघटनेचे आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे राम पाटील, चलवाड तसेच भारतीय किसान श्रमिक जनशक्ती युनियचे बालाजी सूर्यवंशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्रात उद्योगांना चालना देण्यासाठी 'मैत्री' कायदा ! एकल खिडकी योजनेमुळे उद्योजकांना परवानग्या मिळणार जलदगतीने

लातूर :- महाराष्ट्राला देशातील आणि जगातील गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र बनवण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा' अर्थात 'मैत्री' कायदा-२०२३ लागू केला आहे. हा कायदा उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी किंवा त्यांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सरकारी परवानग्या आणि सेवा एकाच ठिकाणी जलदगतीने उपलब्ध करून देतो. 'मैत्री' कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये: एकल खिडकी योजना: उद्योजकांना आता विविध सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. सर्व परवानग्यांसाठी अर्ज करणे आणि त्यांची स्थिती तपासणे एकाच ऑनलाइन पोर्टलवर शक्य होईल. यामुळे वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होईल. वेळेचे बंधन: प्रत्येक परवानगीसाठी निश्चित कालावधी ठरविण्यात आला आहे. जर संबंधित विभागाने या कालावधीत मंजुरी दिली नाही, तर अर्ज स्वयंचलितपणे मंजूर समजला जाईल. पारदर्शकता आणि वेग: ऑनलाइन प्रक्रियेमुळे कामात पारदर्शकता येईल आणि अर्जाची स्थिती प्रत्येक टप्प्यावर तपासता येईल. तक्रार निवारण: कोणत्याही अडचणी किंवा विलंबाच्या बाबतीत तक्रार निवारणासाठी दोन विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.अधिकार प्रदत्त समिती आणि पर्यवेक्षकीय समिती.
या कायद्यामुळे महाराष्ट्रात गुंतवणुकीला चालना मिळेल, नवीन रोजगारांच्या संधी निर्माण होतील आणि राज्याची व्यवसाय सुलभता वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. लहान-मोठे उद्योजक, नवउद्योजक आणि परदेशी गुंतवणूकदारांना याचा मोठा लाभ होणार आहे. उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक माहिती आणि मार्गदर्शनासाठी उद्योग विभागांतर्गत 'मैत्री सेल'मार्फत कॉल सेंटर सुविधा उपलब्ध आहे. यासाठी टोल-फ्री क्रमांक १८०० २३३ २०३३ किंवा ०२२-२२६२२३२२, ०२२-२२६२२३६१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांनी केले आहे.

# पूरस्थिती निर्माण झाली तर; जिल्हाधिकाऱ्यांनी दिली महत्वाची माहिती; पोलीस आयुक्तांनीही केलं नागरिकांना आवाहन



मुंबईसह राज्यभरात अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहाकार केला आहे. धुव्वादार पावसामुळे मुंबईतील जनजीवन पूर्णपणे विस्कळित झालं आहे. मुंबईची लाइफलाईन समजल्या जाणाऱ्या लोकल सेवेवर देखील पावसाचा परिणाम झाला आहे. अनेक सकल भागात पावसाचे पाणी साचले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांना आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नवी मुंबईतली शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सोमवारपासून पुणे शहरात देखील पावसाने कहर केला आहे. पावसाची संततधार सुरूच आहे. या पावसामुळे पुणेकरांची पाण्याची चिंता मिटले आहे. पण पुढील काही दिसत पाऊस असाच सुरू राहिल तर धरणातील पाण्याचा विसर्ग वाढवला जाणार आहे. यामुळे पूरस्थिती देखील निर्माण होऊ शकते, पण सध्या तरी अशी स्थिती निर्माण झालेली नाही. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी महत्वाची माहिती दिली आहे. काय म्हणाले जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी? मागच्या दोन दिवसांपासून पुणे शहराच्या घाटमाथ्यावर जोरदार पाऊस होत आहे. रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर इतर भागात ऑरेंज आणि येलो अलर्ट देण्यात आला आहे. अद्याप तसा काही प्रोब्लेम दिसत नाही. मात्र, शहरी भागात लक्ष देण्याची आवश्यता असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले आहेत.
पण जर पाऊस वाढला तर धरणातून जास्त पाण्याचा विसर्ग केला तर पूरस्थिती येऊ शकते. त्यामुळे आम्ही पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करत आहोत. अजून काही तशी परिस्थिती आलेली नाही, पण जर पाऊस वाढला तर धरणातील पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येईल. यामुळे परिस्थिती उद्भवू शकते. यामुळे जे पूरस्थिती रेषेत येतात, त्यांना हलविण्याची गरज भासू शकते. तशी परस्थिती उद्भवल्यास तशी सूचना प्रशासनाकडून देण्यात येईल, सध्या तशी आवश्यकता वाटत नाही, असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. पोलीस आयुक्तांचे आवाहन पुणेकरांनो, सुरक्षिततेला प्राधान्य द्या! शहरात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. ठिकठिकाणी पाणी साचले आहे. अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडणे टाळा. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधा, असं आवाहन पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केलं आहे. पुणेकरांनो, सुरक्षिततेला प्राधान्य द्या! शहरात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे.
ठिकठिकाणी पाणी साचले आहे. अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडणे टाळा.

# सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात आगळे वेगळे झेंडावंदन!

लातूर :- लातूर शहरातील स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात शुक्रवार,दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी साडे दहा वाजता ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य वर्धापन दिनानिमित्ताने, या संस्थेचे ज्येष्ठ सभासद महादेव राऊत व सभासद-माजी सचिव तथा विधवा महिला मंगलताई बारसकर यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे रोहण करुन देशासाठी प्राणार्पण करणार्या विरांना आणि राष्ट्रपिता महामा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.यावेळी महादेव राऊत यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना पुष्पहार घालून पेढा भरवून अभिष्टचिंतन करण्यात आले.

माजी शिक्षक डी.एन.गुडपल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाच्या सुरवातीला महादेव राऊत व मंगलताई बारसकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रगीत घेण्यात आले.त्यानंतर पाहुण्यांचे पुष्पहाराने स्वागत करण्यात आले.

स्वातंत्र्य संग्रामात सर्व जाती धर्मांच्या लोकांनी सहभाग घेवून देशाप्रती आपले कर्तव्य पार पाडले. स्वातंत्र्याची गोड फळ समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोचली पाहिजेत ही खरी हुतात्म्यांना आदरांजली ठरेल अशा शब्दात डी.एन.गुडपल्ले यांनी स्वातंत्र्य वर्धापन दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.



महादेव राऊत आणि मंगलताई बारसकर,सामाजिक कार्यकर्ते अजहर शेख,कवी प्रदीप कांबळे यांचीही यावेळी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वाचनालयाचे सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी केले.लिपिक संकेत होळीकर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रियंका माने, भूमी माने, विद्याराणी माने,साक्षी कांबळे,माधवराव बनसोडे,बी.जी.बनसोडे, मारुती तलवार, गणपत वाव्हळे, किशन यमुलवाड आदि वाचन,नागरिक उपस्थित होते.

# प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना भ. की. सबनीस राज्यस्तरीय सद्भावना पुरस्कार जाहीर



अंबाजोगाई : योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार संस्था, अंबेजोगाई आणि जय हिंद ग्रुप, अंबेजोगाई यांच्यावतीने दरवर्षी दिला जाणारा भ. की. सबनीस राज्यस्तरीय सद्भावना पुरस्कार लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना जाहीर झालेला आहे. जय हिंद ग्रुपचे सचिव व अध्यक्ष यांनी हा पुरस्कार जाहीर केला. प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सदस्य आणि महाराष्ट्र शासन तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश समिती अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. ते नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता म्हणून देखील कार्य केलेले आहे. त्यांनी आठ ग्रंथाचे लेखन व ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ११ संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी. व च विद्यार्थ्यांना एम फिल पदवी प्राप्त झालेली आहे. ते महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार, प्राचार्य टी. एस. कडगे आदर्श प्राचार्य पुरस्कार आणि महाराष्ट्र फाउंडेशनचा ५० हजार रुपयाचा पुरस्कार आदी विविध पुरस्काराने सन्मानित आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे प्रधानसचिव डॉ. हर्षदिप कांबळे यांची धावती भेट

मुंबई :- समाजातील प्रत्येक तरुणांनी शिक्षणासोबतच उद्योग क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे त्याचबरोबर उद्योग क्षेत्रात कम्प्युटर टेक्नॉलॉजी यात आपला ठसा उमटवला पाहिजे शासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येत आहेत त्या समजून घेऊन आपण त्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत, बौद्धजन पंचायत समिती ही अशी एकमेव संघटना आहे जिचा कारभार हा संविधान लागू होण्याआधीपासून लोकशाही मार्गाने पारदर्शक पद्धतीने व लोकवर्गणीतून सुरू आहे असा मला कळले यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन किती मोठा होता हे लक्षात येतो बाबासाहेबांनी प्रत्येक संघटना निर्माण करताना त्या संघटनेचा पाया मजबूत करण्यावर भर दिला त्यांच्या याच दुरदृष्टीमुळे त्या सर्व संघटना आजही कार्यरत आहेत, बौद्धजन पंचायत समितीचा एवढा मोठा डोलारा लोकशाही तत्ववार सुरु आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे, सध्या अनेक शासकीय योजना आल्या आहेत त्याचा लाभ मिळू शकेल त्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे तसेच तरुणांना बौद्धजन पंचायत समितीच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रामध्ये चांगल्या प्रकारे प्रशिक्षण देऊन त्यांना तयार करता येईल अशी मला खात्री आहे असे प्रतिपादन डॉ. हर्षदिप कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहाच्या बांधकाम पाहणीला धावती भेट देत असता केली.







सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्रालयाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे यांनी धावती भेट देऊबी बौद्धजन पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेत संस्थेच्या पाहणी सोबतच निर्माण होत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहाच्या बांधकामाची पाहणी केली सदर प्रसंगी छोटेखानी सत्कार समारंभ आयोजित करून सभापती आनंदराज आंबेडकर यांनी सर्वांच्या उपस्थितीत शाल व पुष्पगुच्छ देऊन डॉ. हर्षदिप कांबळे यांना सन्मानित केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस राजेश घाडगे यांनी आपल्या पहाडी आवाजात ओघवत्या भाषाशैलीत प्रभावी असे सूत्रसंचालन केले. सदर प्रसंगी सभापती आनंदराज आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४१ रोजी महार न्याती समितीची स्थापना केली होती याच समितीच्या माध्यमातून बाबासाहेबांनी अनेक सत्याग्रह, आंदोलने करून चळवळीला नवी दिशा दिली, सदर समिती लोकशाही मार्गाने चालत होती व पाच वर्षांनी गुप्तमतदान पद्धतीने बॅलेट पेपरवर निवडणूका घेऊन मंत्रिमंडळासारखीच रचना त्यामध्ये होती धर्मांतरानंतर तीच बौद्धजन पंचायत समिती म्हणून ओळखली जाऊ लागली याअंतर्गत ही सामाजिक, शैक्षणिक अनेक उपक्रम राबविले जातात, तसेच निर्माण होत असलेल्या स्मारक सभागृहात टेक्नॉलॉजीवर भर देणारे अभ्यास दालन ही असेल जेणेकरून भविष्यात तरुणांना त्यावर काम करण्यास संधी उपलब्ध होईल असे नमूद केले. सदर प्रसंगी सामाजिक न्यावं व विशेष सहाय्य मंत्रालयाचे माजी सचिव डेंगळे साहेब, बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, मनोहर सखाराम मोरे, चिटणीस श्रीधर साळवी, यशवंत कदम, लवेश तांबे, संदेश खैरे, श्रीधर जाधव, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, महेंद्र शिवराम पवार, मंगेश बाबुराम पवार, सुनील गमरे, सुनील जाधव, अनंत मोहिते, बौद्धाचार्य मंगेश पवार, प्रविण तांबे, प्रताप तांबे आदी अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या सर्वांच्या उपस्थितीत डॉ. हर्षदिप कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह बिल्डिंगची पाहणी केली त्यावेळी आनंदराज आंबेडकरांनी त्यांना संपूर्ण प्रोजेक्टची, कामकाजाची माहिती दिली ते पाहून डॉ. हर्षदिप कांबळे हे ही भारावून गेले. सरतेशेवटी सरचिटणीस राजेश घाडगे यांनी डॉ. हर्षदिप कांबळे व उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# पत्रकार संघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी - राजु पाटील शिंपाळकर यांची निवड



बिलोली /ता.प्र :- छत्रपती संभाजीनगर येथे नुकतच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या मराठवाडा विभागीय रौप्य महोत्सवी अधिवेशनात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित बिलोलीचे जेष्ठ पत्रकार राजु पाटील शिंपाळकर यांची सदर पत्रकार संघ मुंबईच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी घोषीत करण्यात करण्यात आलेल्या निवडीचे आज दि. १८ ऑगस्ट रोजी संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्या आदेशान्वे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासरावजी आरोटे यांच्या हस्ते शिर्डी येथे एका बैठकित नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षा पासुन राजु पाटील हे पत्रकारीतेत काम करीत आसताना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची एकनिष्ठेने बिलोली तालुका अध्यक्ष ते नांदेड जिल्हा अध्यक्ष पदाचा कार्यकाळ यशस्वीपणे पार पाडल्याची राज्य कार्यकारणी व संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्याकडुन योग्य ती दखल घेऊन आता त्याना संघाची मोठी जबाबदारी देण्यात आली आसुन छत्रपती संभाजीनगर येथे गेल्या काही दिवसा पुर्वी पार पडलेल्या पत्रकार संघाच्या विभागिय रौप्य महोत्सवी कार्यक्रमाच्या प्रसंगी उपस्थित सामाजिक न्याय मंत्री ना.संजयजी शिरसाट , इतर मागास बहुजन कल्याण दुग्धविकास ,अपारंपारीक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री ना.अतुल सावे , प.पु.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरी महाराज , आमदार प्रदिप जैस्वाल ,आमदार संजय केणेकर,पत्रकार संघाचे संस्थापक संजयजी भोकरे ,राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे दिल्ली , एबीपी माझा च्या संपादीका सरीता कौशिक, पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे,प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासरावजी आरोटे ,माजी प्रदेश अध्यक्ष वसंत मुंढे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे,प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी , राज्य निवड समिती अध्यक्ष रुपेश पाडमुख,राज्य समन्वयक नितिन शिंदे, मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह आनेक प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित राजु पाटील शिंपाळकर यांची मराठवाडा उपाध्यक्ष पदी निवड जाहीर करण्यात आली होती. सदर निवडीचे नियुक्ती पत्र संस्थापक अध्यक्ष मा. संजयजी भोकरे यांच्या आदेशान्वे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासरावजी आरोटे निवड समितीचे प्रदेश अध्यक्ष रुपेश पाडमुख यांच्यासह अनेकांच्या उपस्थित श्रीसाई बाबांच्या पवित्र पावन भुमीत शिर्डी येथे एका बैठकीत आज दि.१८ ऑगस्ट सोमवार रोजी प्रदान करण्यात आले.सदर निवडीचे दै.आनंदनगरीचे बजरंग शुक्ला सत्य मराठीचे संपादक आयुब पठाण,दै.कलमविरचे संपादक पंडीत तिडके, रमेश देवडे ,बालाजी नार्लेवाड, मो.आरेफ खान पठाण, संजयकुमार गायकवाड , दत्ता पा.माळेगावे तसेच राज्यातील व विविध जिल्ह्यातील पत्रकार संघाच्या पदाधिका-यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांकडुन अभिनंदन होत आहे.

# अनिल कपूर यांनी डॉ. धर्मेंद्र कुमार यांना ७५ लाखांचा धनादेश सुपूर्द केला मोफत आरोग्य शिबिरासाठी

मुंबई / के रवी दादा :-आरोग्यसेवा आणि सामाजिक कार्याच्या क्षेत्रात गौरवाचा क्षण ठरलेला कार्यक्रम, ज्यात प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते अनिल कपूर, जीजेईपीसी अध्यक्ष किरीत भानसाळी, उपाध्यक्ष शौनक पारेख, आणि माजी मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्या उपस्थितीत डॉ. धर्मेंद्र कुमार यांना ७५ लाखांचा धनादेश प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम बांद्रा (पश्चिम) येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडला. आर.के. चआईव्ही एड्स रिसर्च अॅण्ड केअर सेंटर या संस्थेच्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झालेल्या जगातील सर्वात मोठ्या मोफत जनरल मेडिकल कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी हा सन्मान देण्यात आला. धनादेश स्वीकारताना डॉ. धर्मेंद्र कुमार म्हणाले, जीजेईपीसी चा हा विश्वास आणि पाठिंबा आमच्या मिशनला बळकटी देतो. आमचे ध्येय आहे की भारतात कोणताही व्यक्ती फक्त आर्थिक कमतरतेमुळे उपचारांपासून वंचित राहू नये.






डॉ. कुमार गेली २० वर्षे देशभरात मोफत वैद्यकीय शिबिरे आयोजित करत आहेत, आणि गेल्या चार वर्षांपासून विशेषत: बॉलिवूड वर्कर्ससाठी देखील आरोग्य शिबिरांचे आयोजन करत आहेत. त्यांच्या संस्थेने आतापर्यंत हजारो व्हीलचेअर्स, मोफत वाचनासाठी चष्मे आणि कोट्यवधींच्या औषधांचे वितरण गरजू रुग्णांमध्ये केले आहे. टीबी मुक्त भारत अभियान (क्षयरोग निर्मूलन) या केंद्र सरकारच्या मोहिमेतही डॉ. कुमार सक्रियपणे सहभागी आहेत. जीजेईपीसी चा हा पाठिंबा सार्वजनिक-खाजगी सहभागातून समाजाच्या उन्नतीसाठी कसा प्रभावी ठरतो, याचे उत्तम उदाहरण आहे. कार्यक्रमात आरोग्य, कला आणि उद्योगजगतातील मान्यवर एकत्र येऊन या सामाजिक कार्याची दखल घेतली.

# १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी संविधान कट्टा सीबीडी बेलापूर येथे जल्लोषात उद्घाटन

नवी मुंबई / के. एच. हनवते :- घर हक्क संघर्ष समिती आणी युवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाची मूल्ये आणि मानवी जीवनाची मूल्ये यांचे सन्मान जागृती अभियान आयोजित संविधान कट्टा उद्घाटन सोहळा टाटा नगर सेक्टर -१०, कोकण भवन सी बी डी बेलापूर येथे ७९ व्या स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण करून संविधान कट्टा उद्घाटन सोहळा अतिशय थाटामाटा साजरा करण्यात आला, सर्वप्रथम आम्ही भारताचे लोक संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, त्यावेळी या कार्यक्रमाला विविध पक्षाचे, विविध संघटनेचे अनेक मान्यवर उपस्थित होते, त्यावेळी दैनिक महावृत्ताचे सहसंपादक : कल्याणराव हनवते यांनी धडाकेबाज भाषण शैलीने श्रोत्यांची मने जिंकली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी म्हटल्याप्रमाणे यह आजादी झुटी है देश की जनता भुकी है..! स्वातंत्र्याच्या ७९ व्या वर्षी पण अनेक झोपडपट्टीमध्ये गोरगरीब, वंचित घटकांना, कामगारांना आपले हक्क अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यासाठी संघर्ष करावा लागतो आहे, अनेक झोपडपट्टीमध्ये रस्ते, लाईट, पाण्याची व्यवस्था नाही हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत आणि म्हणून डॉ. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, मला या देशाची शासन करती समाज बनायचे आहे..! यासाठी आपल्या देशातील सुजान नागरिकांनी सजग राहुण आपल्या संविधानाने दिलेल्या मतदानाचा योग्य ठिकाणी वापर करून आपले प्रतिनिधी निवडून आणले तरच आपले प्रश्न सुटतील आज घडीला गल्लीपासून दिल्लीपर्यंत या देशात





झाला भ्रष्टाचार, भ्रष्टाचारी आमदार खासदार नेता नामदार, हे आहेत पैशाने दमदार, पण यांना आता चार मुंड्या चित्त करणार मतदार... याप्रमाणे आपण पुढील वाटचाल करूयात तेव्हाच आपल्याला खरे स्वतंत्र्य मिळेल..! या भरगच्च कार्यक्रमाला मरीना जोसेफ (साथी युवा संस्था ), कैलाश सरकटे ( खजिनदार, घर हक्क संघर्ष समिती ), मा. विरेंद्र लगाडे ( जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), बाबा न्यायनीत ( संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय एकता दल ), सुनिल भोले ( महासचिव नवी मुंबई वंचित बहुजन आघाडी ), अजय सिंह ( युवा अध्यक्ष मंडल भाजपा ), सुमित साळुंखे ( युवासाथी भाजपा), इंद्रजीत शेंडगे ( समाजसेवक, राष्ट्रवादी अजित पवार गट), सुषमा शिंदे ( संस्था डॉन बॉस्को ), सुकन्या जाधव ( साथी युवा संस्था ), जयसिंग रणदिवे ( युवा संस्था), रेखाताई इंगळे ( महीला जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), दीपाताई बम ( कार्याध्यक्ष रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), कोंडीबा हिंगोले ( अध्यक्ष कामगार एकता युनियन नेरूळ नवी मुंबई ), विष्णू वासमणी ( सचिव रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), अशोक जमादार ( अध्यक्ष, महात्मा गांधी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था ), सुनंदाताई बाविस्कर ( अध्यक्ष टाटानगर सहकारी गृहनिर्माण संस्था ), जगन्नाथ निकम, दीपक वाघ, अक्षय जोहरे, राहुल लोखंडे, श्रीकांत साखरे, लक्ष्मी भोगे, सुमित्रा साबळे, इत्यादी वस्तीतील शेकडो नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला, या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन घरहक्क संघर्ष समिती खजिनदार : कैलास सरकटे यांनी केले व सर्व उपस्थित भारतीय नागरिकांना ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा देऊन कार्यक्रम संपन्न केला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE